# नियमीत दिवाणी मुकदमा क्र.२६३/२०१७ मधील
# निशाणी क्र.३८ वर आदेश

**CNRNO.MHLA110010922018.**

०१. सदरचा अर्ज प्रतिदाव्यातील प्रतिवादीने विनाकैफियतीचा आदेश बाजूस सारुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, सदर प्रतिवादी हा आजारी असल्यामुळे मुदतीत न्यायालयात हजर राहुन कैफियत दाखल करु शकलेला नाही. तसेच प्रतिदावा हा स्थावर मिळकतीबाबत आहे. त्यामुळे सदर प्रतिवादीला कैफियत दाखल करण्यास परवानगी न दिल्यास प्रतिवादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे. त्यामुळे सदर प्रतिवादीविरुध्द झालेला विनाकैफियतीचा आदेश बाजूस सारुन कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्याची सदर प्रतिवादीने मागणी केली आहे.

०२. सदर अर्जास प्रतिदाव्यातील वादीने म्हणणे दाखल करून तिव्र विरोध दर्शविलेला आहे.

०३. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरुन याठिकाणी नमुद करणे आवश्यक वाटते की, सदर प्रतिवादीला प्रतिदाव्यास कैफियत दाखल करण्याकरिता पुरेशी संधी देऊन देखील प्रतिवादीने मुदतीमध्ये कैफियत दाखल केलेली नाही. तसेच सदर अर्जातील कथनाच्या पृष्ठर्थ सदर प्रतिवादीने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे केवळ नैसर्गिक न्यायाचे तत्व विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, पक्षकारांमधील वादाचे निराकरण गुणदोषावर होणे आवश्यक आहे. त्याकरिता सदर प्रतिवादीला देखील बचाव मांडण्याची संधी देणे

न्यायोचीत होणार आहे. तसेच सदर अर्जामुळे प्रकरण निकाली निघण्यास होणारा विलंब खर्चाच्या स्वरुपात भरुन काढणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब व पक्षकारांमधील वादाचे स्वरुप विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, सदर अर्ज प्रतिवादीवर खर्च बसवून मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. नि.क्र.३८ वरील अर्ज प्रतिदाव्यातील प्रतिवादीवर रक्कम रु.८००/– खर्च बसवून मंजूर करण्यात येत आहे.

२. वर नमूद खर्चाची रक्कम प्रतिवादीने प्रतिदाव्यातील वादीला पुढील तारखेपर्यंत द्यावे अथवा न्यायालयात जमा करावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Shivakant Machhindra Gourgond
Date: 2020.02.28 17:58:21 +0530

(शिवकांत म. गौरगोंड)

दि.२८.०२.२०२०. सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
निलंगा.